MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ३६८/२०१०-११ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | सौ. गौरी राजेंद्र बिराजदार ,<br>मु.पो. बोर्गी बुद्रुक, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, सांगली | विरुध्द पक्षकार |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**<u>न्याय निर्णय</u>**

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

सौ. गौरी राजेंद्र बिराजदार , मु.पो. बोर्गी बुद्रुक, ता. जत, जि. सांगली यांनी आपले प्रतिनिधी श्री. हरिभाऊ खापरे यांजमार्फत मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी विरुध्द दि. ५.१.२०११ रोजी तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

ग्राहक हे वि.प.चे शेती पंप ग्राहक आहेत. त्यांनी बोर्गी बुद्रुक, जि. सांगली येथील आपली शेती गट क्र. ३७/२ब मध्ये ५ अश्वशक्ती नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी अर्ज केला. वि.प.ने ग्राहकास वीज पुरवठा तात्काळ पाहिजे असेल तर स्वखर्चाने L.E.C. (वितरण कंपनीच्या मान्यताप्राप्त कंत्राटदार) च्या माध्यमातून वाहिनी उभी करुन घ्यावी व मा.आयोगाच्या दि. ८.९.२००६ च्या आदेशानुसार वितरण कंपनी अंदाजपत्रकाच्या १.३% दराने नॉर्मेटिव्ह चार्जेसच्या दराने स्वत: सुपरव्हीजन करणेसाठी आकारेल असे सांगितले. ग्राहकाने त्यास मान्यता दिल्यानंतर अंदाजपत्रक EE/SGL/R/DDF/९/०८-०९ ने मंजुरी दिली. ग्राहकाने दि. १७.४.२००८ ला चलन पावती क्र. ९९१७५८३ नुसार भरले. त्यामध्ये १.३% DDF charges - रु. ३१६/- व SA III रु. २५००/- भरुन घेतले. ग्राहकाने वि.प.च्या देखरेखीखाली वितरण वाहिनी विस्तार L.E.C. कडून करुन घेतल्यावर वि.प.ने ग्राहकाला दि. ५.६.२००८ ला विद्युत पुरवठा दिला आहे. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार वि.प.ने आपल्या वरिष्ठ कार्यालयाचे परिपत्रक क्र. २२१९८ दि. २०.५.२००८ चे पालन केले नाही. डी.डी.एफ. संबंधी मा. आयोगाच्या आदेशाचे पालन केले नाही. मा. आयोगाने केस क्र. ५६/२००७ मधील दि. १६.२.२००८ चे आदेशातील निर्देशानुसार वि.प.ने विद्युत पुरवठा केला नाही. डी.डी.एफ. योजनेनुसार विद्युत पुरवठा नाही, पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी विनियम २००५ मधील कलम २ (जी ) च्या व्याख्येनुसार नाही. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि.३०.१०.२०१० ला तक्रार दाखल केली. कक्षाने कुठलेही आदेश केले नाहीत, म्हणून प्रस्तुतची तक्रार मंचामध्ये दाखल केली. अंदाजपत्रकाची एक प्रत ग्राहकास मिळावी. मा. आयोगाच्या केस क्र. ९३/२००८ मधील दि. १.९.२०१० चे आदेशाचे पालन व्हावे ज्यामध्ये MSEDCL should adjust the extra charges collected by MSEDCL in the energy bills of the respective consumers म्हटले आहे. परतावा रक्कम वि.प.ने एखाद्या परिपत्रकानुसार न करता मा. आयोगाच्या आदेशानुसार करावी. ग्राहकास चलन भरल्याच्या दिनांकापासून वरील रक्कम मिळेपर्यंतच्या कालावधीसाठी कलम ६२.६ विद्युत कायदा २००३ नुसार व्याज मिळावे. तक्रारीसोबत फर्म कोटेशन, तिमाही बील मार्च २०१० व रु. २८१६/- च्या पावतीची झेरॉक्स प्रत हजर केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. २५.१.२०११ च्या लेखी अहवलात ग्राहकाने शेतीपंपासाठी दि. १७.४.२००८ रोजी अनामत रक्कम भरलेली आहे व त्यांना दि. ५.६.२००८ रोजी वीज जोडणी देण्यातआल्याचे म्हटले आहे. ग्राहकाचा अंदाजपत्रक मंजुरी क्र. EE/SGL/R/DDF/०९/०८-०९ आहे. ग्राहकास असलेल्या लघुदाब वीज वाहिनीच्या जाळ्यातून वीज जोडणी दिलेली आहे. परतावा वि.प.चे परिपत्रक क्र. ३९२०६ दि. २१.१२.२००९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ग्राहकास प्रत्येक बिलातून एकूण रकमेपैकी ५०% रक्कम ग्राहकाने प्रत्यक्ष केलेल्या इन्फ्रास्ट्रक्चर खर्चापोटी समायोजित करण्यात येईल व उर्वरित ५०% रक्कम ग्राहक भरतील व हे समायोजन संपूर्ण खर्चाची रक्कम संपेपर्यंत राहिल असे म्हटले आहे. ग्राहकानी केलेला इन्फ्रास्ट्रक्चर खर्चाचा (प्रत्यक्ष झालेला खर्च) तक्ता/ तपशील वि.प.च्या सहा.लेखापाल यांचेकडून रितसर लेखा परिक्षण करुन घेवून जोडला आहे. अंदाजपत्रक नंतर मंचासमोर हजर करीत आहे असे म्हटले आहे. वि.प.ने आपल्या परिपत्रक क्र. २२१९८ दि. २०.५.२००८ वर भरोसा ठेवला आहे. त्या परिपत्रकामध्ये -

MSEDCL Circular has a provision of refunding infrastructure expenses incurred by the prospective Non DDF consumers for getting early connection through energy bill. The same provision was not applicable prior to implementation of this Circular during the period ८th Sept.२००६ ( Schedule of Charges Order ) and MSEDCL Circular dated २०.५.२००८ MSEDCL has compelled several Non DDF consumers to avail the DDF facility and bear the infrastructure expenses such infrastructure expenses forced on the consumers during the aforesaid period ( i.e. ८th Sept. २००६ to २०th May २००८) requires to be refunded to respective consumer as per provision of this Circular dated २०.५.२००८.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर सुनावणीसाठी दि. ७.३.२०११ ला घेण्यात आली. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, श्री. टिळक, सहाय्यक अभियंता व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता उपस्थित. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी परताव्याची रक्कम एस्टिमेटेड कॉस्ट, बिलातून मिळावी. वि.प.चे अधिकारी श्री. टिळक यांनी १.३% DDF charges - रु. ३१६/- ग्राहकाने भरले आहेत. एस्टिमेटेड कॉस्ट रु. ३१,१८५/- आहे. Detailed Estimate देण्यासाठी वि.प.ला ११.३.२०११ पर्यंत मुदत देण्यात आली. त्यानंतर दि. २४.३.२०११ ला परत मंचासमोर सुनावणी घेतली असतां, ग्राहक प्रतिनिधी उपस्थित नव्हते. वि.प.चे अधिका-यांनी WCR देत आहे असे म्हटले. अधिक म्हणणे देवून त्यात ग्राहकाची वीज जोडणी दि. ५.६.२००८ ला दिली. वि.प.ची सर्वोच्च न्यायालयात केस क्र. २०३४०/०७ प्रलंबित आहे याचा विचार व्हावा. म्हणण्यासोबत ग्राहकाचे अंदाजपत्रक, शपथपत्र (अंडरटेकींग) व लागलेल्या साहित्याची यादी जोडत आहे असे म्हटले आहे.

प्रस्तुत केसची पुढील सुनावणी दि. ७.४.२०११ ला ठेवली असतां, ग्राहक प्रतिनिधी उपस्थित. वि.प.चे अधिकारी उपस्थित. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी मंचाला लेखी अर्ज देवून असे स्पष्ट केले की, सर्व्हीस लाईन चार्जेस हा विषय वेगळा आहे व शेड्यूल ऑफ चार्जेसच्या विपरीत ग्राहकास करावा लागलेल्या रकमेचा परतावा हा विषय वेगळा आहे व हे मा. आयोगानेही सुस्पष्ट केलेले आहे. वितरण कंपनीने ग्राहकांकडून सर्व्हीस लाईन चार्जेस जे भरुन घेतले आहेत, त्याचा अकौंट वेगळा आहे व ग्राहकाकडून शेड्यूल ऑफ चार्जेसच्या विपरीत करुन घेतलेला खर्च वेगळा आहे. उदाहरणादाखल एका ग्राहकाचे चलन तपशील व विद्युत पुरवठा केलेले देयक जोडले आहे. आपल्या म्हणण्यापुष्ट्यर्थ त्यांना मा. राज्य आयोग केस क्र. ९३/२००८ दि. १.९.२०१० च्या आदेशाचा संदर्भ घेतला आहे. एस.एल.सी. सोडून इतर सर्व खर्च ग्राहकाने मंचाकडे मागणी केल्यास ग्राहकास परत द्यावा लागेल, कारण हा सर्व खर्च कंपनीने ग्राहकास शेड्यूल ऑफ चार्जेसच्या विपरीत करावा लावलेला खर्च आहे व हा खर्च परत करतांना कोणत्याही न्यायप्रक्रियेस बाधा येत नाही हा मा. आयोगाचा आदेश आहे. मा. आयोग, मा. विद्युत लोकपालजी व मा. अमरावती, भांडूप, नागपूर, कोल्हापूर, पुणे, औरंगाबाद अशा अनेक ठिकाणी चुकीच्या डीडीएफ/ सीएसएस चे परतावे मिळालेले आहेत.

या सर्व ठिकाणी वितरण कंपनीने हे परतावे परत दिलेले आहेत, या आदेशांना वितरण कंपनीने न्यायालयात आव्हान दिलेले दिसून येत नाही. उलटपक्षी, मा. मंच यांनी आदेश दिलेवर तो पालन न झालेस मा. आयोगाकडे दाद मागितली तर हा परतावा लगोलग दिलेची उदाहरणे आहेत असे म्हटले आहे. सोबत मा. आयोगाची केस क्र. १०९/२०१० मधील दि. ३०.३.२०११ च्या आदेशाची प्रत जोडली आहे. श्री. खापरे यांनी प्रस्तुत ग्राहकाचे नॉर्मेटिव्ह चार्जेस १.३% रु. ३१६/- असल्याने अंदाजपत्रकीय रक्कम रु. २४३०७/- मूळ मागणीप्रमाणे परत मिळावी अशी मागणी केली आहे. वि.प.चे अधिकार-यांनी यावर लेखी म्हणणे दाखल केले नाही. ग्राहकास वीज जोडणी दि.५.६.२००८ रोजी दिली असल्याचे स्पष्ट केले.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाची अंदाजपत्रकीय रक्कम १२% व्याजासह वीज बिलातून परतावा करण्याची मागणी मंजूर करणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

## कारणमिमांसा

उभयबाजूच्या लेखी कथनानुसार व मंचासमोर तोंडी विवेचनानुसार तक्रारदार हे वि.प.चे अेजी कनेक्शन ग्राहक आहेत. त्यांनी दि. १७.४.२००८ रोजी पैसे भरले आहेत व त्यांना दि.५.६.२००८ रोजी विद्युत पुरवठा सुरु केला आहे. त्याची मंजुरी EE/SGL/R/ DDF/९/०८-०९ नुसार दिली आहे. ग्राहकाने नॉर्मेटिव्ह चार्जेस १.३% रु. ३१६/- भरले आहेत.अंदाजपत्रकीय रक्कम ग्राहकाचे म्हणण्यानुसार रु. २४३०७/- आहे. वि.प.ने कार्यकारी अभियंता कवठे महांकाळ यांच्या सहीचे एस्टिमेट दिले आहे त्यामध्ये एस्टिमेट कॉस्ट रु.३११८५.८७ दाखविली आहे. Total cost to be refunded रु. २१७४५.०४ दाखविली आहे. ग्राहकाकडून १.३% रु. ३१६/- Supervision charges on normative charges वसूल केले आहेत.

ग्राहकाने आपल्या तक्रारीत म्हटल्याप्रमाणे मा. आयोगाच्या आदेशानुसार डी.डी.एफ. योजना वि.प.ने राबविली नाही. ग्राहकाचा वेगळा अकौंट ठेवला नाही, वेगळी वाहिनी उभारली नाही. आपल्या लेखी अहवालात म्हटल्याप्रमाणे वि.प.ने अस्तित्वात असलेल्या लघुदाब वाहिनीच्या जाळ्यातून ग्राहकाला वीज जोडणी दिली आहे. त्यामुळे ग्राहकाने म्हटल्याप्रमाणे डी.डी.एफ. योजनेचे काम हे मा. आयोगाच्या निर्देशानुसार निश्चितपणे झाले नाही. ग्राहकाने वि.प.च्या मान्यताप्राप्त कंत्राटदाराकडून विद्युत वाहिनी उभारणीचे काम करुन घेतले आहे. ग्राहकास परताव्याची रक्कम अद्यापही दिली नाही, त्यामुळे प्रथम अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे अर्ज केला त्यात आदेश झाले नाहीत, म्हणून मंचाकडे प्रस्तुतची तक्रार दाखल केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या मुळ लेखी अहवालात मा. आयोगाची केस क्र. ९३/२००८ मधील दि. १.९.२०१० च्या आदेशात परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ चा उल्लेख केला आहे.

त्याचा संदर्भ घेवून वि.प.च्या वरिष्ठ कार्यालयाचे परिपत्रक क्र. ३९२०६ दि. २१.१२.२००९ चा संदर्भ घेवून प्रत्यक्ष इन्फ्रास्ट्रक्चर किंमत ग्राहकाच्या प्रत्येक बिलातून एकूण रकमेपैकी ५०% रक्कम ग्राहकाने प्रत्यक्ष केलेल्या इन्फ्रास्ट्रक्चर खर्चापोटी समायोजित करण्यात येईल व उर्वरित ५०% रक्कम ग्राहक भरतील व हे समायोजन संपूर्ण खर्चाची रक्कम संपेपर्यंत राहिल यावर भर देवून अशा पध्दतीने परताव्याचे आदेश व्हावेत अशी मंचासमोर विनंती केली. त्याचप्रमाणे वि.प.ने जादा म्हणण्यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या सिव्हील अपिलचा विचार व्हावा अशी मागणी केली आहे. ग्राहकाची वीज जोडणी दि. ५.६.२००८ ला झाली आहे, वि.प.चे परिपत्रक क्र . ३९२०६ दि. २१.१२.२००९ चे आहे. त्यामुळे ५०% परतावा वीज बिलातून समायोजित करण्याचा प्रश्न येत नाही. तसेच वि.प.चे परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ ची बाधा येत नाही. कारण वीज जोडणी दि. ५.६.२००८ ला झाली आहे. मा. आयोगाचे केस क्र. ९३/२००८ मधील दि. १.९.२०१० चे आदेश या केसला लागू होतील त्यामुळे ग्राहकास परताव्याची रक्कम पूर्णपणे वीज बिलातून देण्याचे आदेश करणे योग्य होईल. ५०% परतावा वीज बिलातून समायोजित करण्याची वि.प.ची मागणी ग्राह्य धरता येत नाही, कारण हे परिपत्रक prospective consumers साठी लागू होत आहे. मा. आयोगाने परताव्याची रक्कम वीज बिलातून द्यावी असे आदेश दिले आहेत, त्यानुसार परतावा देणे योग्य होईल. मा. आयोगाच्या केस क्र. ९३/२००८ मधील दि. १.९.२०१० च्या आदेशात
MSEDCL should adjust extra charges collected by it through energy bills of the respective consumers असे म्हटले आहे.

This directive of refund of excess recovered charges will not be applicable to the charges of which refund is stayed by Hon'ble Supreme Court in Civil Appeal No. २०३४० of २००७ असे म्हटले आहे. वि.प.चा डी.डी.एफ.चा परतावा मा. सर्वोच्च न्यायालयात subject matter आहे हे ठामपणे म्हटले नाही किंवा ते subject matter आहे असे दाखवू शकत नाहीत असे म्हणावे लागेल. ग्राहक प्रतिनिधींनी दि. ७.४.२०११ ला मंचासमोर वि.प.च्या अधिका-यांचे समक्ष अमरावती झोनचे अमरावती ग्राहक तक्रार निवारण मंच यांचे आदेशाविरुध्द ग्राहकाने मा. आयोगाकडे कलम १४२ विद्युत कायदा २००३ खाली कारवाई केली, त्यामधील दि. २०.३.२०११ च्या आदेशाचा संदर्भ घेवून डीडीएफ परताव्याची रक्कम हा सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकाराचा विषय होत नाही असे ठामपणे सांगितले. केस क्र. १०९/२०१० मध्ये ग्राहकाने मा. आयोगाचे अमरावती सी.जी.आर.एफ.ने पालन केले नाही म्हणून कलम १४२, १४९ खली तक्रार दाखल केली. या केसमध्ये दि.१३.६.२००८ रोजी एस्टिमेटला मंजुरी देण्यात आली होती. मा. मंच यांनी अशी रक्कम ग्राहकास परत करण्याचे आदेश केले आहे. या ग्राहकाने डी.डी.एफ. खाली अर्ज केल्यानंतर अमरावती ग्राहक मंचने दिनांक १३.१०.२०१० च्या आदेशानुसार वि.प.ला ग्राहकास रु. ३,५५,०८५/- ( सुपरव्हीजन चार्जेस रु. ४५५७/- सह ) १०% व्याजाने ३० दिवसांत परत देण्याचे आदेश दिले.

त्या आदेशाचे नंतर पालन झाल्याचे ग्राहकाने मा. आयोगास कळविले. यावरुन डीडीएफ परताव्याची रक्कम हा सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकाराचा विषय होत नाही या म्हणण्यास पुष्टी मिळते असे ग्राहक प्रतिनिधींनी सांगितले. त्यामुळे ग्राहकाने आपल्या दि.६.४.२०११ च्या अर्जात मागणी केलेली अंदाजपत्रकीय रक्कम रु. २४३०७/- व नॉर्मेटिव्ह चार्जेस १.३% रु. ३१६/- मंजूर करणे योग्य होईल. वि.प.ने audited infrastructure cost दाखल केली नाही. एस्टिमेट कॉस्ट रु.३११८५.८७ दाखविली आहे. Total cost to be refunded रु.२१७४५.०४ दाखविली आहे. या व्यतिरिक्त रु. ३१६/- ग्राहकाकडून वसूल केल्याचे दाखविले आहे. थोडक्यात ग्राहकाने प्रत्यक्ष केलेला खर्च रु.२१७४५.०४ व १.३% नॉर्मेटिव्ह चार्जेस रु. ३१६/- परत करण्याचे आदेश करणे योग्य होईल.

ग्राहक प्रतिनिधींनी सदर रक्कम समायोजित होईपर्यंत चलन भरल्याच्या तारखेपासून ६२.६ नुसार व्याज मिळावे अशी मागणी केली आहे. ग्राहक तक्रार निवारण मंच, अमरावती यांनी आपल्या आदेशात १०% व्याज दिले आहे ते from the date of assets handed over. या केसमध्ये ग्राहक चलन भरल्याचे तारखेपासून व्याज मागत आहे, त्या ऐवजी ग्राहकास विद्युत वाहिनी उभारणीसाठी झालेला खर्च, त्यांस दि. ५.६.२००८ वीज जोडणी मिळालेल्या तारखेपासून १०% व्याजासह सदरची रक्कम ग्राहकाच्या वीज बिलातून पूर्णपणे समायोजित होईपर्यंत व्याज देणे योग्य होईल, कारण ग्राहकाने लघुदाब वाहिनी उभारणीचे कामासाठी वि.प.च्या चुकीच्या सांगण्यावरुन खर्च केला आहे. कायद्यानुसार वि.प.ने विद्युत वितरण वाहिनी उभी करुन वीज जोडणी देण्याचे कर्तव्य आहे, त्यामुळे ग्राहकाची व्याजाची मागणी मान्य करणे योग्य होईल. ग्राहकास रु. २१७४५/- या रकमेवर १०% व्याज दि. ५.६.२००८ पासून सदर रक्कम वीज बिलातून समायोजित होईपर्यंत मंजूर करणे योग्य होईल. मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे.

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) विद्युत वितरण कंपनी कवठे महांकाळ विभाग यांनी ग्राहकास रु. २१७४५/- या रकमेवर १०% व्याज दि. ५.६.२००८ पासून सदर रक्कम तिमाही वीज बिलातून समायोजित होईपर्यंत द्यावे. तसेच रु. ३१६/- रोखीने त्वरित परत द्यावेत.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बाद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

**<u>ग्राहक तक्रार क्र. ३६८/२०१०-११</u>**

मा. अध्यक्ष यांनी दिलेल्या आदेशाशी सहमत नसल्यामुळे श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव स्वतंत्र मत नोंदवित आहे.

**ग्राहक तक्रार क्र. ३६८/२०१०-११**
**(सौ. गौरी राजेंद्र बिराजदार, मु.पो. बोर्गी बु. ता. जत जि. सांगली )**

आदेशातील क्र. (२) नुसार ग्राहकास रु. २१,७४५/- या रकमेवर १०% व्याज जोडणी दिल्याच्या तारखेपासून म्हणजे दि. ५.६.२००८ पासून बिलातून परतावा सुरु होईपर्यंतच्या कालावधीसाठी वितरण कंपनीने द्यावे यास माझी हरकत आहे.

कारणे -

१) सदरील ग्राहकास परताव्याची रक्कम ही वितरण कंपनीचे परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ नुसार दिलेली आहे. शेतीपंपासाठी कनेक्शन हे नॉन डी.डी.एफ. या सदराखाली समजून परतावा मंजूर करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे आदेशातील क्र. २ नुसार वितरण कंपनीने ग्राहकास रु. २१,७४५/- ही परताव्याची रक्कम त्यांच्या वीज बीलातून समायोजित करुन द्यावी.

सदर परतावा हा परिपत्रक दि. २०.५.२००८ नुसार मान्य केला असून तो दि. २०.५.२००८ नंतर देणेत येणा-या ( prospective ) वीज कनेक्शनसाठी लागू आहे.

(२) परिपत्रकाच्या तरतुदीनुसार खर्चावरील व्याज देता येणार नाही. व्याज देण्याबाबतची रक्कम व त्याचा कालावधी ठरविण्यास निश्चित आधार नाही.

सदर ग्राहकास विद्युत पुरवठा दि. ५.६.२००८ रोजी देण्यात आला. परिपत्रकाच्या तरतुदीनुसार ग्राहकास येणा-या प्रथम बिलापासून परतावा देणे योग्य होईल. म्हणजे शेतीपंपाच्या वापरासाठी त्रैमासिक बिलींग पध्दतीप्रमाणे परतावा चालू होणे आवश्यक होते, परंतु तसे झाले नाही. म्हणून वीज जोडणी नंतरच्या प्रत्येक बिलींग सायकल मधील वीज बिलाची ५०% रक्कम परताव्याच्या पहिल्या बिलातून एकदम समायोजित करावी, त्यासाठी व्याज व विलंब आकारणी करु नये. जर ग्राहकाने बीले भरली असल्यास परतावा सुरु होण्यापूर्वीच्या कालावधीसाठी भरलेल्या बिलाच्या ५०% रकमेवर १०% व्याज द्यावे. ५०% रकमेच्या परताव्याबाबतचे वितरण कंपनीचे परिपत्रक क्र. ३९२०६ दि. २१.१२.२००९ लागू राहील जे परिपत्रक क्र.२२१९७ दि. २०.५.२००८ वर आधारीत आहे.

( जी. बी. पानकर )
सदस्य सचिव
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर